मुख्य अभियंता (पथ) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. ५५७२
दिनांक :- ०१/०४/२०२६

मा. उद्यान अधिक्षक
उद्यान विभाग
पुणे महानगरपालिका.

मा. महापालिका सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष प्राधिकरण अधिकारी,
घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

विषयः- गणेशखिंड रस्ता रूंदीकरणातील बाधित वृक्ष स्थलांतर करणेकामी मोबदल्यात नवीन वृक्ष लागवड केलेल्या वृक्षांची जिओ टॅग सर्व्हे करणे व महापालिका वेबसाईटवर अपलोड करणेबाबत.

संदर्भः- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१७/०४/२०२४ रोजी दिलेले आदेश.

पथ विभाग, पुणे मनपामार्फत गणेशखिंड रस्ता संचेती ते विद्यापीठ दरम्यानचा येथे ४५ मी.डी.पी. रस्ता रूंदीकरणाचे टप्पा क्र.१ चे काम पुर्ण झालेले आहे. सदर कामामध्ये अडथळा ठरणारे वृक्ष काढणे/ स्थलांतरित करण्याचे मोबदल्यात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पथ विभागामार्फत खालीलप्रमाणे नवीन वृक्ष लागवड केलेली आहे.

अ.क्र	नवीन वृक्ष लागवड केलेली ठिकाणे	वृक्षांची संख्या
१	पंचवटी परिसर	८५८
२	गणेशखिंड रस्ता	१७५
३	पशु संवर्धन आयुक्तायलय, औंध	१८८९
४	पशु संशोधन केंद्र नदीकडेला	४४७
५	अंडी उबवणी केंद्र, खडकी	१२९०
६	देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, वाकडेवाडी	३५६
	एकूण	५०१५

मे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ५०१५ नवीन वृक्ष लागवडीचे उद्यान विभागामार्फत जिओ टॅग करण्यात आलेलेअसुन, उद्यान विभागास जिओ टॅगबाबत पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत अनिवार्य करण्यात आलेले आहे. तसेच सदर नवीन वृक्ष लागवडबाबतची स्थिती दर तीन महिन्यांनी पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. पथ विभागामार्फत कनिष्ठ अभियंता यांना दर तीन महिन्यांनी अहवाल सादर करणेबाबत नोडल अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे., त्यानुसार पथ विभागामार्फत माहे मार्च २०२६ मध्ये उद्यान विभागास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. दि.३१/०३/२०२६ रोजी पथ विभागामार्फत नवीन वृक्ष लागवड बाबतची स्थितीची पाहणी केलेली आहे.

०।C- खोत सो

D:\~ pawan data\~ Ganeshkhind road letter

सदरची माहिती खालीलप्रमाणे-

TREE REPORT

अ.क्र	नवीन वृक्ष लागवड केलेली ठिकाणे	वृक्षांची संख्या	अस्तित्वातील वृक्षांची संख्या	जळालेली/तुटलेली वृक्षांची संख्या
१	पंचवटी परिसर	८५८	८०८	४०
२	गणेशखिंड रस्ता	१७५	१७३	२
३	पशु संवर्धन आयुक्तायलय, औंध	१८८९	१७८७	८०
४	पशु संशोधन केंद्र नदीकडेला	४४७	४१७	२५
५	अंडी उबवणी केंद्र, खडकी	१२९०	१२४०	३५
	एकुण	४६५९	४४७७	१८२

टीपः- देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, वाकडेवाडी सदर ठिकाणी ३५६ वृक्षांची लागवड करण्यात आलेली होती. तथापि सदर ठिकाणी संबंधित विभागामार्फत पाण्याची लाईन टाकतेवेळेस सदर वृक्ष तुटलेली आहेत. त्या अनुषंगाने जा.क्र. पथ/७०८२ दि.२५/०९/२०२५ रोजी वृक्ष इतर ठिकाणी लावणेबाबत संबंधित विभागास नवीन वृक्ष लागवड करून मिळणेबाबत कळविले आहे.

वरील अहवालानुसार नवीन वृक्ष लागवडीचा ९६.०९% Survival Rate आंहे.

तरी, सदरचा अहवाल पुणे महानगरपालिका वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

उप अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका
1/4/2026

मा. मुख्य अभियंता(पथ)
पुणे महानगरपालिका

माहितीस्तव सादर...